# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.01.2025** **वार- शनिवार**

---

**पुणे फिल्म फाऊंडेशन**

तेविसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 13 ते 20 फेब्रुवारीदरम्यान होणार असून त्यात एकंदर 40 मराठी चित्रपट स्पर्धा विभागासाठी नोंदविण्यात आल्याची माहिती उत्सवाचे संचालक डॉक्टर जब्बार पटेल यांनी आज दिली. पुणे फिल्म फाऊंडेशन, राज्याचा सांस्कृतिक विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरीद्वारे संयुक्तपणे हा महोत्सव आयोजित आहे. चाळीसपैकी सात चित्रपट अंतिम स्पर्धेसाठी निवडण्यात आले आहेत. विजेत्या चित्रपटाला राज्य सरकारचा संत तुकाराम सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार दिला जाणार आहे.

**रिक्षाचालक**

रिक्षा चालकांविरोधातील तक्रारीसाठी सुरु केलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर आलेल्या तक्रारींवरून रिक्षाचालकांवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाई केली जात आहे. यातील सर्वाधिक तक्रारी भाडे नाकारल्याच्या आहेत. तक्रारीनंतर आतापर्यंत 65 रिक्षाचालकांना नोटीसा बजावल्या आहेत. आरटीओनं रिक्षाचालकांच्या विरोधात तक्रारी करण्यासाठी 8275330101 हा व्हाट्सअॅप क्रमांक सुरु केल्यावर गेल्या काही महिन्यात 135 तक्रारी आल्या आहेत अशी माहिती पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी दिली.

**एसटी-चार्जिंग**

एसटी पुणे विभागाच्या ताफ्यात येत्या वर्षभरात 200 इलेक्ट्रिक बस येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर, पूर्वीपेक्षा जास्त बस चार्जिंग करण्यासाठी चार्जिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तावित स्वारगेट, दापोडी ‘चार्जिंग स्टेशन्सवर एकाच वेळी 36 बस चार्ज होणार आहेत. सध्या पुणे विभागात 66 इलेक्ट्रिक बस आहेत असं पुणे एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी सांगितले.

पुंडे
डॉ. द. दि. पुंडे यांनी मराठी भाषेवर यांनी केवळ प्रेमच केलं नाही, तर मराठी भाषेच्या सर्वांगीण समृध्दीसाठी मोठं योगदान दिल्याची कृतज्ञ भावना ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉक्टर सुधाकर भोसले यांनी आज पुण्यात व्यक्त केली. साहित्यदीप प्रतिष्ठनतर्फे देण्यात येणारा साहित्यदीप जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. द. दि. पुंडे यांना प्रदान करताना डॉक्टर सुधाकर भोसले बोलत होते. यावेळी डॉक्टर पुंडे यांच्या विद्यार्थिनींनी पुष्पवृष्टी करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला.

**सत्कार**
विद्यार्थी सहाय्यक समितीच्या माजी कार्यकारी विश्वस्त वसुधा परांजपे यांच्या स्मृत्यर्थ समिती आणि परांजपे कुटुंबियांच्या वतीनं सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मुक्तांगण व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन केंद्राच्या संचालक मुक्ता पुणतांबेकर, 'जीवितनदी'च्या संस्थापक संचालक शैलजा देशपांडे यांना 'वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार' आज पुण्यात प्रदान करण्यात आले.

**निवड**
पुणे महापालिकेच्या नगरसचिवपदी योगिता भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भोसले या पुणे महापालिकेच्या पहिल्या महिला नगर सचिव ठरल्या आहेत. यापूर्वी त्यांनी महापौर राजशिष्टाचार अधिकारी म्हणून काम पाहिलं आहे.

**पर्पल-जल्लोष**
दिव्यांगांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशन यांच्या वतीनं 'पर्पल जल्लोष  दिव्यांगांचा महाउत्सव सुरू आहे. याअंतर्गत आज दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात 'कौशल्य आणि व्यावसायिक प्रशिक्षण' या विषयावर चर्चासत्र झालं. यामध्ये औद्योगिक आणि स्वयंसेवी संस्थांमधील तज्ज्ञांनी दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधीवर चर्चा केली. यानंतर दिव्यांगांसाठी फॅशन शोचं आयोजन करण्यात आलं होतं.  त्यानंतर मिरॅकल ऑन व्हील्स'हा कार्यक्रम  सादर करण्यात आला. शिवनृत्य, भरतनाट्यम्, कथक जुगलबंदी सादर करण्यात आली.  दिव्यांग बांधवांनी हनुमान चालिसा नृत्य करीत त्या माध्यमातून रामायणातील प्रसंग दाखवला. तसंच काळजाचा ठोका चुकवणारं मार्शल आर्ट्सवरील नृत्याचं सादरीकरण करण्यात आलं.

**दौड**
भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, बार्टी, संरक्षण आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सामरिकशास्त्र विभाग यांच्यातर्फे

‘अमृत महोत्सवी संविधान सन्मान दौड 2025’ चे आयोजन करण्यात आलं आहे. 25 जानेवारी रोजी पहाटे साडेपाच वाजता विद्यापीठातील खाशाबा जाधव क्रीडा संकुलातून स्पर्धा सुरू होईल.

**टेनिस**

ग्लोबल वरिष्ठ टेनिस संघटनेच्या वतीनं सोलारिस करंडक वरिष्ठ पुरूष राष्ट्रीय टेनिस स्पर्धा पुण्यात आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेच्या पात्रता फेऱ्यांना आजपासून सुरुवात झाली. यामध्ये पुण्याच्या समीर मंसुरी, शंकर सणस, बालकृष्ण अंजारे, आशिष चौहान, केतन गद्रे आणि दलविंदर सिंग यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूचा पराभव करून आगेकूच केली.

पुणे आणि परिसरात उद्या आकाश अंशतः ढगाळ राहून किमान 15 तर कमाल 30 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**